

कोल्हापूर : दसरा चौक येथील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे भरविण्यात आलेल्या ग्रंथ कॉर्नर पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, शाहू स्मारक भवनचे व्यवस्थापक कृष्णाजी हरगुडे, ग्रंथपाल लक्ष्मण पाटील, सुभाष पाटील आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन ५ ते २८ जून अखेर सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत सर्वांसाठी सुरू राहणार आहे. प्रदर्शनात एक लाखांहून अधिक जुन्या व नवीन पुस्तकांचा समावेश आहे.

# 'यूजीसी'चे कुलगुरूंना पत्र लिहून निर्देश

नवी दिल्ली, ता. ८ : आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम सर्व विद्यापीठांमध्ये सक्तीचा करण्यात आला आहे. येत्या २१ जूनला (शुक्रवार) आयोजित केल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील सर्व कुलगुरूंना पत्र लिहून स्पष्ट निर्देश दिले आहेत.

या कार्यक्रमाला विद्यापीठांच्या कक्षेतील सर्व महाविद्यालयांचे कर्मचारी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची उपस्थिती असावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सकाळी सात ते आठ या वेळेत योग दिनाचा सरकारी कार्यक्रम साजरा केला जाणार आहे.

योगदिनी ओंकाराचा उच्चार करण्याबाबत मुस्लिम विद्यार्थी संघटनांनी पहिल्यापासूनच विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर 'यूजीसी'च्या ताज्या निर्णयांच्या अंमलबजावणी-बाबत उत्सुकता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योग दिनाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी केलेल्या ट्विटमध्ये स्वतःचा ताडासन करतानाचा व्हिडिओ शेअर केला होता, तसेच योगाचे शारीरिक तंदुरुस्तीसाठीचे फायदे अधोरेखित केले होते. यंदाच्या योग दिनासाठी झारखंडची राजधानी रांची हे शहर केंद्राने निवडले आहे. तेथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमास मोदी स्वतः उपस्थित राहून योगासने करतील. 'यूजीसी'ने दिलेल्या निर्देशांत म्हटले आहे की, योगदिनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना योग करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

# 'मराठीच्या भल्यासाठी' सहविचार सभा आज

कोल्हापूर : दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर (दमसा) आणि कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आज, रविवारी सायंकाळी साडेपाच वाजता 'मराठीच्या भल्यासाठी' ही सहविचार सभा होणार आहे. प्रेस क्लबमध्ये होणाऱ्या सभेत शालेय स्तरावर मराठी सक्ती, मराठीचे संवर्धन आणि सशक्तीकरण, आदींबाबत चर्चा करण्यात येईल. त्यामध्ये कोल्हापूर आणि सीमा भागातील साहित्य संस्था, प्राथमिक पुरोगामी शिक्षक संघटना, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, मराठी बालकुमार साहित्य सभा, गावशिवार साहित्य संघ, सह्याद्री साहित्य संघ, वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्था, साहित्यिक, लेखक, पत्रकार, शिक्षक आणि मराठी भाषा प्रेमी सहभागी होणार आहेत. सभेसाठी मराठीप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन 'दमसा'चे अध्यक्ष विजय चोरमारे यांनी केले आहे.